# Blood & Health check-up camp at Toshniwal College, Sengaon




## सेनगावात रक्तगट व हिमोग्लोबीन तपासणी



देशोन्नती वृत्तसंकलन...

हिंगोली ▪ तोष्णीवाल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सेनगाव येथील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व हेल्थकेअर सेंटर तसेच ग्रामीण रुग्णालय सेनगाव यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे रक्तगट व हिमोग्लोबिनची तपासणी करण्यात आली.

याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.जी. तळणीकर तसेच डॉ. एस. व्ही राठोड (वैद्यकीय अधीक्षक, ग्रामीण रुग्णालय, सेनगाव) यांची मुख्य उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. टी.यू. केंद्रे यांनी सध्याच्या फास्ट फूडच्या भोजन प्रणालीमुळे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा विशेषतः मुलींचा हिमोग्लोबिनचा स्तर हा खूप कमी झाला आहे. त्यामुळे त्यांची हिमोग्लोबिनची तपासणी करून योग्य तो उपचार करण्यासाठी सदर शिबिराचे आयोजन केले आहे, असे प्रतिपादन केले. सदर तपासणी शिबिरासाठी ग्रामीण रुग्णालय सेनगाव येथील संदीप राठोड (समुपदेशक, राष्ट्रीय किशोर स्वास्थ कार्यक्रम), श्रीमती एस. पारसकर (एल.एस. ओ.), श्रीमती विद्या तौर (एल. एस. ओ.), बोरकर (एल.एस. ओ. एच. एल. एल.), श्रीमती हागे, वैभव खंदारे यांनी मेहनत घेतली. शिबिरातील कार्यक्रमाचे संचलन कार्यक्रमाधिकारी प्रा. टी.यू. केंद्रे यांनी तर आभार हेल्थकेअर सेंटरचे समन्वयक प्रा. एन. एस. गायकवाड यांनी व्यक्त केले. सदर शिबिरात १०४ विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली. शिबिराच्या यशस्वीतेसाठी कार्यक्रम अधिकारी डॉ. व्ही.बी. कल्याणकर, प्रा.के. एस. पवार, प्रा.डी.डी थोरात, डॉ.एस. एस. मरकड, प्रा. एच.टी. शिंदे तसेच राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक यांनी मेहनत घेतली. (प्रतिनिधी)